98

# जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकणाचे मंजूर विकास योजनेतील जकातनाका चौक ते रावेत वाल्हेकरवाडी शिवनाला पर्यंतचा ३४.५० मी. रस्त्यापैकी स नं ११२ ते स नं १२२ पर्यंतच्या प्रलंबित रस्ता नागरिकांना दळणवळणासाठी उपलब्ध नाही. त्यामुळे महानगरपालिकेसही तेथील रहिवाश्यांना मुलभूत/ सुविधा जसे रस्ता, विद्युत खांब, पाणीपुरवठा व जलनिस्सारण वाहिनी इत्यादी सुविधा पुरविता येत नाही. सदर रहिवासीयांच्या अडीअडचणीचा यथोचित विचार करून तसेच मनपा मार्फत यापुर्वी देणेत आलेले विकास योजना अभिप्राय, बांधकाम मंजू-या व जागेवरील परिस्थिती ( Previous Commitments ) यांचा विचार करून सोबत जोडलेल्या नकाशात जांभळया रंगाने दर्शविल्याप्रमाणे वाल्हेकरवाडी गावठाणालगतच्या स नं ८७ ते स नं ११६ मधील पेट्रोल पंपापर्यंत सदर रस्त्याची आखणी कायम करून तसेच तेथून पुढे रावेत चिंचवड शिवनाल्या पर्यंत सोबतच्या नकाशा मध्ये जांभळया रंगाने दर्शविल्या प्रमाणे रस्त्याची आखणी कायम करणेबाबत निर्णय झाला आहे. मा. ब प्रभाग समिती सभा ठराव क्र:- ०६, दि:- १२/०९/२०१७ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील जकातनाका चौक ते रावेत वाल्हेकरवाडी शीवनाल्यापर्यंतच्या ३४.५० मी रस्त्यापैकी स नं ११२ ते १२२ पर्यंतच्या कायम केलेली रस्ता आखणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५ अन्वये घोषित करणेकामी मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर रस्ता घोषित करावयाचा आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/ सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/ सूचनांवर योग्य तो विचार करून रस्ता अंतिमत: घोषित करण्याची कार्यवाही केली जाईल. उक्त मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकत/सूचना विचारात घेतल्या जाणार जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

स्थळ – पिंपरी, पुणे
दिनांक - २८/१०/२०१७

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

( टिप: सदर सुचना व नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवरही उपलब्ध आहे. )